दिनाक १८.१०.२०१४ रोजीचे आरोग्य समिती सभेचे इतिवृत्त

आरोग्य समितीची सभा दिनांक १८/१०/२०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.अध्यक्ष जि.प. यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेस खालील सन्मा.सदस्य व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

—: सर्व श्री. सन्माननीय :—

| अकं | उपस्थित सर्व सन्मा सदस्य यांची नांवे | पद |
|---|---|---|
| १ | मा.डॉ.सौ.आरती हरिभाउ फुपाटे | अध्यक्ष |
| २ | सन्मा.सौ.ज्योतीताई जि.ठेंगे | सदस्य |
| ३ | सन्मा.श्री.पंढरीभाउ हरिभाउ सिंहे | सदस्य |
| ४ | सन्मा.प्रविण बाबारावजी उईके | सदस्य |
| ५ | सन्मा.श्री.शिवशंकर श्रावण पांढरे | सदस्य |
| ६ | सन्मा.सौ.सुलोचनाताई मो. भोयर | सदस्य |
| ७ | सन्मा.सौ.निलीमाताई मधुकरराव गोहणे | सदस्य |
| ८ | डॉ. के.झेड्.राठोड | सचिव तथा जिआअ |

—: अधिकारी व निमंत्रीत:—

| अक्रं | अधिकारी व कर्मचारी यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | श्री.एस.एम.तपासे | का.अ बा.वि. क्रमांक १ जि.प |
| २ | डॉ.के. आर. गुजर | वै.अ कुष्ठरोग कार्यालय |
| ३ | डॉ संजय जिद्येवार | ताआअ राळेगांव |
| ४ | डॉ.विजय उमरे | ताआअ घांटजी |
| ५ | डॉ.आशिष पवार | ताआअ पुसद |
| ६ | डॉ.एस.एम.मडावी | ताआअ झरी |
| ७ | डॉ.संजय तोडासे | ताआअ वणी |
| ८ | डॉ.रविंद्र दुर्गे | ताआअ नेर |
| ९ | डॉ.सुषमा खोडवे | ताआअ यवतमाळ |
| १० | डॉ.विजय गांवडे | ताआअ मारेगांव |
| ११ | डॉ.डि.व्ही.सावंत | ताआअ पांढरकवडा |
| १२ | डॉ.पि. डी. देशमुख | ताआअ उमरखेड |
| १३ | डॉ.विकास नवंरगे | ताआअ दारव्हा |
| १४ | डॉ.सि.एस. भोंगाडे | ताआअ दिग्रस |
| १५ | डॉ.राजश्री देशमुख | वै.अ क्षयरोग कार्या.यवतमाळ |
| १६ | श्री.लिलेश साखरवाडे | उपअभियंता बांधकाम एनआरएचएम |
| १७ | श्री.आर.एल.मशरू | शा.अ बा.वि. क्रमांक १ जि.प. |
| १८ | श्री.जि.एस. भारशंकर | शा.अ.विद्युत बा.वि. क्रमांक २ जि.प |
| १९ | श्री.व्हि.टि. खर्चे | उपअभियता.एमएसईडिसी |
| २० | श्री.गणेश घंटेवार | प्रति.अपअभियंता कार्या.वणी |
| २१ | श्री.आर.पी. अहिरे | प्रति.मु.अ.शा.जि.आ. प्रयोगशाळा |
| २२ | श्रीमती एस.ए.लिचडे | पिसिपिएनडिटी यवतमाळ |
| २३ | श्री.एस.एस.कान्नव | नेत्रचिकित्सक अधिकारी |
| २४ | कु.सुजाता बोरकर | सिकलसेल कोऑडिनेटर |
| २५ | श्री.जी.सी. शेंडे | आ.सहा ताआअ कार्यालय पांढरकवडा |
| २६ | श्री.पि.के.भोंग | स्विय सहायक मा.अध्यक्ष जि.प |
| २७ | श्री.ऐ.के. गावंडे | व.सहा आरोग्य विभाग नियोजन शाखा |
| २८ | आर..एन.कुबडे | प्रति. जि.ही.अ कार्यालय |
| २९ | श्री.डी.एन.बाडे | प्रति.ताआअ बाभुळगांव |
| ३० | श्री.टि.डी.मेश्राम | प्रति.ताआअ महागांव |
| ३१ | श्री.जे.पी.पाटिल | प्रति.ताआअ कळंब |
| ३२ | श्री.डि.एम. ठाकरे | आ.सहा सभा शाखा |

सर्वप्रथम सचिव तथा जि.आ.अ यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले.स्वागत केल्यांनतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेला सुरूवांत केली.

विषय क्रमांकः–१ :–दिनांक २३.०९. १४ रोजी झालेल्या आरोग्य समिती सभेच्या अहवालांचे वाचन करणे व त्यांस कायम करून मंजुरात प्रदान करणे बाबत

दिनांक २३.०९..२०१४ रोजी झालेल्या आरोग्य समिती सभेच्या अहवालाच्या प्रती सर्व उपस्थित सन्मा सदस्यांना देण्यांत आल्या ,अहवालांचे वाचन सपल्यानंतर सन्मा.सदस्यांनी खालील मुद्दे उपस्थित करून चर्चा केली व मा. अध्यक्ष यांनी सचिव तथा जिआअ यांना आवश्यक ते निर्देश दिले.

१) सन्मा.श्री.प्रविण बा.उईके :– यांनी प्रा.आ.केंद्र बेलोरा ता. यवतमाळ येथील इमारतीचे निर्लेखनाचें कामा बाबत काय झाले अशी विचारणा करून सदर काम ब–याच दिवसापासुन पुर्ण झालेले नाही तेंव्हा निर्लेखनांचे काम त्वरीत पुर्ण करून नविन इमारत बांधकाम त्वरीत पुर्ण करावे अशी माहिती सभागृहांत दिली.

यावर मा.अध्यक्ष यांनी सदर प्राआकेंद्राचे निर्लेखनांचे काम त्वरीत पुर्ण करून,नविन इमारतीचे काम त्वरीत पुर्ण करण्याबात का.अ बा. वि. क्र १ यांना निर्देश दिले.

२) सन्मा. श्री.शिवशंकर श्रा.पांढरे :– यांनी प्राआउपकेंद्र दराटी हे हस्तांतरीत झाले काय अशी विचारणा करून हस्तांतरण करण्यांची कार्यवाही करावी अशी माहिती सभागृहांस देउन कार्यवाहीची मागणी केली आहे.

यावर मा. अध्यक्ष यांनी आरोग्य विभागाअंर्तत जी बांधकामे ,बांधकाम विभागांनी पुर्ण केलेली आहे.परंतु हस्तातरीत केले नाही अशी किती कामे आहेत याबाबत माहिती देउन पुर्ण झालेली बांधकामे त्वरीत आरोग्य विभागांस हस्तातरीत करावे असे निर्देश का.अ बा. वि.क्रमांक २ यांना दिले.

तसेच सन्मा. सदस्यांनी प्रा.आ.केंद्र सोनदाभी येथील इमारतीचे काम मागील तिन वर्षापासुन झालेले नाही फक्त खड्डे ,खोदुन ठेवलले आहे.तसेच आजपावेतो केलेल काम हे निकृष्ठदर्जाचे होत आहे.तसेच बांधकामांत वापरलेले साहित्य विटा,रेती,गिट्टी,सिमेंट हे अतिशय निकृष्ठ दर्जाचे आहे.तसेच वॉलकम्पांडचे कामा मध्ये सुध्दा असाच प्रकार आहे त्यामुळे इमारतीच्या कामांची गुणवत्ता कशी राहील याबाबत शंका व्यक्त करून सदर कामांची तपासणी/ चौकशी करण्यांत यावी व केलेल्या चौकशीचा अहवाल पुढील सभेत सादर करण्यांबाबत मागणी केलेली आहे.

यावर मा. अध्यक्ष यांनी सदर कामाची तपासणी करून चौकशी अहवाल पुढील सभेत सादर करण्यांचे निर्देश का.अ बा.वि.क्रमांक २ यांना दिले.

३) सन्मा. सौ. ज्योतीताई जि. ठेंगे :– यांनी प्रा.आ.उपकेंद्र धनज येथील बांधकाम पुर्ण होउन हस्तातरीत झाले काय अशी विचारणा करून सदर काम त्वरीत हस्तातरीत करण्यांची कार्यवाही करावी अशी सभागृहांस मागणी केली.

यावर मा. अध्यक्ष यांनी सदर काम पुर्ण झाले असल्यांस त्वरीत हस्तातरीत करण्यांची कार्यवाही करावी असे निर्देश का.अ बा.वि. क्रमांक २ यांना दिले. .

४) मा. अध्यक्ष यांनी आरोग्य विभागाअंतर्गत बांधकामाच्या कार्याचा आढावा घेतला असता ,पुसद तालुक्यांतील खडकदरी येथील उपकेंद्राचे काम पुर्ण होउन हस्तातरीत झाले काय अशी विचारणा केली.प्रा.आ.केंद्र /उपकेंद्राचे नविन बांधकाम /प्रसुतीगृह बांधकाम /दुरूस्ती/किरकोळ दुरूस्ती ची कामे किती दिवसांत पुर्ण व्हावयांस पाहीजे.याबाबत माहिती विचारून सदर कामे हाती घेतल्यापासुन काही विशीष्ठ मुदतीतच बांधकाम पुर्ण व्हावयास पाहीजे.परंतु तसे होतांना दिसत नाही तेंव्हा यापुढे प्राआकेंद्र/उपकेंद्राचे कामांस विलंब होणार नाही याबाबत बांधकाम विभागांनी दक्षता घ्यावी अशा सुचना देण्यांत आल्या तसेच पुढील आरोग्य समिती सभेत जिल्हयांतील किती प्राआकेंद्र /उपकेंद बांधकामासंबधी तसेच हस्तांतरणा संबधी संपुर्ण माहिती सादर करण्यांच्या सुचना करून किती कामे आरोग्य विभागांस हस्तातरीत करण्यांत आले याबाबतची माहिती सादर करावी त्याप्रमाणे प्राआकेंद/उपकेंद्रातील ओटि गळती होतात. किती ठिकाणी दुरूस्तीची कामे सुरू आहे ती सर्व कामे एका विशीष्ठ मुदतीत पुर्ण करावे अशा सक्त सुचना बांधकाम विभागांस दिल्यां

तसेच प्राआकेंद्र धानोरा /घारफळ/हिवरी येथील बांधकाम नविनच असुन तेथील स्लॅब गळत असल्यांची माहिती ताआअ यांनी देउन प्राआकेंद्र शिरपुर येथील स्लॅब गळत असल्यांची माहिती सभागृहांस दिली.तसेच जिल्हयांतील ब–याच प्राआकेंद्रातील ओटि/स्लॅब गळत असल्यांची माहिती सभागृहांस सादर करून त्याबाबतची दुरूस्ती करण्यांत यावी असे सभागृहांत सांगीतले.

वरील सर्व प्रकरणी कार्यवाहीचे निर्देश देउन मा. अध्यक्ष यांनी खालील ठरांव माडला

ठराव क्र. १– दिनांक २३./०९/२०१४ रोजी झालेल्या आरोग्य समिती सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले व त्यांस मंजुरी देण्यात आली. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

विषय क्र.२ शासन परिपत्रकाचे वाचन करणे.

सचिव तथा जिआअ यांनी, शासनाकडुन आरोग्य विभागाअंतर्गत शासन परिपत्रक ,शासन निर्णय प्राप्त झाले नाही अशी माहिती दिली.

विषय क्र. ३ :–माहे सप्टेंबर–१४ अखेरपावेतो कुटुंब कल्याण कार्यक्रमा अतंर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्याची माहिती सचिव तथा .जि.आ.अ. यांनी खालील प्रमाणे सादर केली.

| अक्र | विवरण | वार्षिक लक्ष | मासिक कार्य | प्रगतीपर कार्य | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | कु.क.शस्त्रक्रिया | १५७३९ | १४८७ | ३५३० | २२ |
| २ | तांबी | १०५५९ | ६१९ | ३४६० | ३३ |
| ३ | गर्भनिरोधक गोळया | ९३४९ | ७२२ | ६०२८ | ६४ |
| ४ | निरोध (युझर्स) | ०० | १४ | ४६२८७ | ०० |

उपरोक्त कार्याच्या आढाव्यावर चर्चा होउन .मा. अध्यक्ष, यांनी खालील प्रमाणे ठराव मांडला

ठराव क्र. २ :– माहे सप्टेंबर–१४ अखेरपावेतो कुटुंब कल्याण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

विषय क्र.४ :– माहे सप्टेंबर–१४ अखेरपावेतो माताबाल संगोपन व सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमा अतंर्गत कार्याचा आढावा घेणे. सदर कार्याची माहिती सचिव तथा. जि.आ.अ.यांनी खालील प्रमाणे सादर केली.

| अ.क्र. | विवरण | वार्षिक लक्ष | मासिक कार्य | प्रगतीपर कार्य | टक्के. |
|---|---|---|---|---|---|
| १ | डि.पी.टी. | ४४७६२ | ३८६१ | २१८३८ | ४८ |
| २ | पोलीओ | ४४७६२ | ३८५२ | २१७३५ | ४८ |
| ३ | मिझल्स | ४४७६२ | ३४९२ | २३१३० | ५१ |
| ४ | बि.सी.जी. | ४४७६२ | ६७२० | २२५१६ | ५० |
| ५ | काविळलस | ४४७६२ | ३४२२ | २१२२५ | ४७ |
| ६ | टि.टि.गरोदर माता | ४९२३८ | ३२१४ | १९३९७ | ३९ |
| ७ | एफ.एस. मोठया गोळया | ४९२३८ | ०० | २२६७२ | ४६ |
| ८ | एफ.एस. लहान गोळया | २१६६८० | ०० | ९१५९ | ४ |
| ९ | व्हिटॅमिन अ ५वा डोज | ४५६६१ | ७४७८ | १३९५२ | ३० |

आपरोक्त कार्याच्या आढाव्यावर चर्चा होवुन मा.अध्यक्ष, यांनी खालील ठराव मांडला

ठराव क्र.३– माहे सप्टेंबर–१४ अखेरपावेतो माताबाल संगोपन व सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

विषय क्र.५ :– माहे सप्टेंबर–१४ अखेरपावेतो क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाअतंर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्याची माहिती प्रतिनिधी. जि.क्ष.अ कार्यालय यांनी खालील प्रमाणे सादर केली

| अ.क्र. | विवरण | नार्मप्रतिलक्ष लोकसंख्या | वार्षिक अपे.साध्य | मासिक अपे.उदिष्टये | माहे सप्टे–१४ | प्रगतीपर | टक्के | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नविनथुंकी दुषितरूग्णशोधणे | ५६प्रतिलक्ष लोकसंख्या | २३०८ | १९२ | ९० | ५५९ | – | |
| २ | नविनथुंकी अदुषित रूग्ण शोधण | ५६प्रतिलक्ष लोकसंख्या | २३०८ | १९२ | ५८ | ३३० | – | |
| ३ | जुने रिट्रीटमेंट केसेस | २८प्रतिलक्ष लोकसंख्या | ११५५ | ९६ | ४६ | २८३ | – | |
| ४ | फुफुसेत्तर क्षयरूग्ण | ११प्रतिलक्ष लोकसंख्य | ४६२ | ३९ | ४८ | ३१० | – | |
| ५ | एकुण क्षयरूग्ण | २८दशलक्ष लोकसंख्या | ६२३३ | ५१९ | २४२ | १४८५ | – | |
| | | | | | | | | |
| | | कॅट –१ | – | – | ४६ | २८३ | – | |
| | | कॅट –२ | – | – | २४२ | १४४२ | – | |
| | | कॅ ट –३ | – | – | १२० | ७५० | – | – |
| | | – | – | – | ७४ | ४२५ | – | – |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | थुंकी दुषित | — | — | ४८ | ३१० | — | — |
| | | थुंकी अदुषित | — | — | २४२ | १४८५ | — | — |
| | | फुफुसेत्तर | | — | | | | |
| | | एकुण | — | — | ३५३ पैकी २८५ | ८१(टक्के) | | — |
| १ | उपचारामुळे बरे झालेले क्षयरूग्ण | ८५टक्केपेक्षा जास्त | — | — | ३५३ पैकी २२ | ०६(टक्के | | — |
| २ | मृत्यु झालेले क्षयरूग्ण | ५ टककेपेक्षा कमी | — | — | ३५३ पैकी १८ | ५( टक्के) | — | — |
| ३ | उपचार सोडलेले क्षयरूग्ण | ५ टककेपेक्षा कमी | २३०८ | १९२ | ९० | ५५९ | — | |

उपरोक्त कार्याच्या आढावा सादर केल्यांनतर उपस्थित सन्मा.सदस्य श्री.शिवशंकर श्रा.पांढरे व सन्मा.सदस्य श्री.प्रविण बा. उईके यांनी हिवताप व डेंग्यु हया आजाराचे रूग्ण वाढत असल्यांचे सभागृहांचे निर्देशनांस आणुन दिले.व यावर आरोग्य विभागांनी वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करावयांस पाहीजे असे सागुन ग्रामपचांयत स्तरावर साफसफाई करण्याबाबत ग्रा.प. नी पुढाकार घेणे आवश्यक असल्यांचे सांगीतलें यावर सचिव तथा जिआअ यांनी सदर आजारा बाबत सभागृहांत सविस्तर माहिती देउन सदर आजार होउच नये याकरिता हिवताप कार्यालय व ताआअ यांना सभेत सुचना देण्यांत आल्या व सदर सुचनेचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सुचित केले. यावर मा. अध्यक्ष यांनी साथरोग व किटकजन्य आजारावर नियंत्रण मिळवण्याकरिता प्रतिबंधात्मक उपचार पध्दतीचा अवलंब करावयांस पाहिजे असे सभागृहांत प्रतिपादन करून सदर आजाराचें रूग्ण वाढणर नाही याबाबत आरोग्य विभागांनी दक्षता घ्यावी असे सांगीतले. व यावर चर्चा होउन मा. अध्यक्ष, यांनी खालील प्रमाणे ठराव मांडला

ठराव क्र. ४:– माहे सप्टेंबर–१४ अखेरपावेतो क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते.ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला

विषय क्र.६ :– माहे सप्टेंबर–१४ अखेरपावेतो हिवताप नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्याची माहिती प्रतिनिधी जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय यांनी खालील प्रमाणे सादर केली

| अक्र. | विवरण | वार्षिक लक्ष | मसिक कार्य | प्रगतीपरकार्य | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | घरोघरी घेतलेले रक्तनमुने | २३३१४० | ४८९४२ | २१३८६४ | २०९ |
| २ | दवाखान्यात घेतलेले रक्तनमुने | ९९९१६ | ३५९९३ | १०६२८३ | ३६० |
| ३ | सामुदायीक घेतलेले रक्तनमुने | ०० | ६२८ | १७८९ | ०० |
| ४ | एकुण बेरीज | ३३३०५६ | ८५५६३ | ३२१९३६ | २५६ |
| ५ | आढळलेले दुषित रक्तनमुने | ०० | ८२ | ३०७ | ०० |
| ६ | समुळ उपचार घेणारे रूग्ण | ०० | ८२ | ३०७ | ०० |

उपरोक्त कार्याच्या आढाव्यावर चर्चा होउन .मा. अध्यक्ष, यांनी खालील प्रमाणे ठराव मांडला

ठराव क्र. ५– माहे सप्टेंबर–१४ अखेरपावेतो हिवताप नियंत्रण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

विषय क्र.७– माहे सप्टेंबर–१४ अखेरपावेतो कुष्ठरोग निमुर्लन कार्यक्रमा अंतर्गत कार्याचा आढावा घेणे.

सदर कुष्ठरोग निमुर्लन कार्यक्रमा अंतर्गत कार्याची माहिती ,वै.अ सहायक संचालक (कुष्ठरोग)कार्यालय यवतमाळ यांनी खालील प्रमाणे सादर केली

| अ.क्र. | दर्शक मुदयाचें नांव | मासीक | प्रगतिपर | प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | शोधलेले नविन कुष्ठरूग्ण | ३६ | २१० | १५ |
| २ | नविन कुष्ठरूग्णामध्ये स्त्रीया | १७ | ९९ | ४७ |
| ३ | नविन कुष्ठरूग्णामध्ये सांस.रूग्ण | १३ | १०१ | ४८ |
| ४ | नविन कुष्ठरूग्णामध्ये मुलांची संख्या | ० | ११ | ५ |
| ५ | नविन कुष्ठरूग्णामध्ये विकृतीचे रूग्ण | ० | ८ | ३ |
| ६ | अनुसुचित जातीचे नविन कुष्ठरूग्ण | ३ | ३८ | १२ |
| ७ | अनुसुचित जमातीचे नविन कुष्ठरूग्ण | १० | ४७ | ८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | औषधोपचार मुक्त झालेले रूग्ण | ३२ | २१९ | ०० |
| ९ | विविध कारणांनी कमी झालेले रूग्ण | ० | ८ | ०० |
| १० | महिनाअखेर एकुण कियाशील रूग्ण | ०० | २८६ | ०० |
| ११ | कुष्ठरूग्ण अस्तित्व दर (पी.आर) | ०० | ०० | ०.९९ |

उपरोक्त कार्याच्या आढाव्यावर चर्चा होउन मा. अध्यक्ष,आरोग्य समिती यांनी खालील प्रमाणे ठराव मांडला

ठराव क. ६ :– माहे सप्टेंबर–१४ अखेरपावेतो कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला

विषय क. ८ :–माहे सप्टेंबर–१४ अखेरपावेतो नेंत्रशस्त्रकीया कार्यकमा अंतर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्याची माहिती नेत्र चिकित्सक अधिकारी ,अंधत्व निवारण संस्था यांनी खालील प्रमाणे सादर केली अंधत्व निवारण कार्यक्रमातंर्गत जिल्हयाला २०१४–१५ या वर्षात ५०२५ चे लक्ष देण्यात आले होते. त्यानुसार माहे सप्टेंबर–१४ मध्ये ५५७ मोतिबिंदु शस्त्रकीया करण्यात आल्या.माहे सप्टेंबर–१४ अखेरपावेतो प्रगतीपर १९१२असून त्याची टक्केवारी ३८ आहे.

विषय क. ९ :–माहे सप्टेंबर–१४ अखेरपावेतो पाणी शुध्दीकरण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्याची माहिती, प्रतिनिधी मुख्य अणुजीव शास्त्रज्ञ जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा यांनी खालील प्रमाणे सादर केली माहे सप्टेंबर–१४ मध्ये अणुजीव तपासणी करीता २६५८पाणीनमुने घेण्यात आले त्यापैकी ६१५ पाणीनमुने दुषित आढळले त्याची टक्केवारी १२ ही आहे. त्याच प्रमाणे माहे सप्टेंबर–१४ मध्ये ब्लिचिंग पावडरचे ४६४नमुने घेण्यात आले त्यापैकी ६३नमुने २० टक्कयापेक्षा कमी क्लोरीन असल्याचे आढळले त्याची टक्केवारी४ ही आहे.

विषय क १०:–यवतमाळ जिल्हयांतील मुलीचे लिंग प्रमाण वाढ करणे बाबत

सदर विषयांची माहिती सचिव तथा जिआअ यांनी,खालील प्रमाणे सादर केली की, माहे सप्टेंबर–१४ मध्ये तालुका महागांव मध्ये जन्म लिंग गुणोत्तर ( १००० पुरूष जन्मामागे स्त्रिजन्माचे प्रमाण ) प्रमाण हे ११२३ एवढे आहे सदर प्रमाण हे जिल्हयांतील इतर तालुक्यापेक्षा जास्त आहे तद्‌वतच त्यापाठोपाठ अनुक्रमे बाभुळगांव / कळंब / झरीजामणी / दिग्रस / राळेगांव येथील सुध्दा काम समाधानकारक आहे

तसेच आर्णी / नेर / वणी / उमरखेड / पुसद / मारेगांव / दारव्हा / पांढरकवडा / पुसद / या तालुक्यांत पुरूषांचे जन्मांचे तुलनेत स्त्रिजन्मांचे प्रमाण फारच कमी आहे.स्त्रिजन्मांचे प्रमाण वाढविण्याकरिता सदर तालुक्यांनी जास्त प्रयत्न करणे आवश्यक आहे . सदर कार्यक्रमाअंतर्गत स्त्रिजन्माचे प्रमाणांत वाढ करण्यांबाबत प्रयत्न करणे आवश्यक असल्यांचे सांगुन मा. अध्यक्ष यांनी जिल्हयांतील मुलींचे लिंग प्रमाण वाढ करण्यांबाबत ग्रामिण भागांतील जनतेत जनजागृती करणे अतिशय आवश्यक आहे जनजागृती करण्यांचे दृष्टीने विभागाने दक्षता घ्यावी असे सभागृहात प्रतिपादन केले. तसेच ज्या तालुक्यांत सेक्स रेशो मध्ये पुरूष जन्माचे तुंलनेत स्त्रिजन्माचे प्रमाण हे फारच कमी आहे. सदर प्रमाण वाढविण्या बाबत कार्यवाही करावी असे निर्देश मा. अध्यक्ष यांनी उपस्थित सर्व ताआअ यांना दिले.

यावर सभागृहांत सविस्तर चर्चा होउन चर्चा होउन मा. अध्यक्षांनी खालील ठरांव मांडला

ठरांव क ७:–यवतमाळ जिल्हयांतील मुलींचे लिंग प्रमाण वाढ करणे बाबत ग्रामिण भागांत जनजागृती करणे आवश्यक आहे या करिता हि सभा सर्वानुमते मंजुरात देते व ठरांवावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठरांव सर्वानुमते मंजुर करण्यांत आला.

विषय क. ११ :– माहे सप्टेंबर–१४ अखेर पावेतो सिकलसेल कार्यकमा अंतर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्यक्रमा अंतर्गत झालेल्या कार्याची माहिती सिकलसेल कोऑर्डिनेटर (एनआरएचएम) आरोग्य विभाग यांनी.माहे सप्टेंबर–१४ मध्ये एकुण जिल्हयाला महिण्यांचे २५०००उध्दिष्ठ असुन सोल्युबीलीटी टेस्ट केलेल्या व्यक्तींची संख्या ४३६४आहे.त्यामध्ये सोल्युबीलीटी टेस्ट सकारात्मक असलेल्या व्यक्तीची संख्या १०५ एवढी आहे. तसेच इलेक्ट्रोफोरसीस टेस्ट करिता पाठवलेलया रक्त नमुन्यांची सख्या १०५ आहे. सदर तपासणी मध्ये वाहक ८६,रूग्ण ९,नकारात्मक १० आहे. एकुण कार्डवाटपा मध्ये लाल कार्ड ९ ,पिवळे कार्ड ८६ व पांढरे कार्ड ४२६९ आहेत.अशी माहिती सभागृहांस सादर केली. सदर कार्याच्या आढाव्यावंर सभागृहांत सविस्तर चर्चा होउन खालील प्रमाणे ठरांव मांडला

ठराव क. ८ :– माहे सप्टेंबर–१४ अखेरपावेतो सिकलसेल कार्यकमाच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

(६)

विषय क्र.१२:—आरोग्य विभागांअतर्गत सप्टेंबर—१४ अखेरपावेतो झालेल्या बांधकामाच्या कार्याचा आढावा घेणे.

माहे सप्टेंबर—१४ अखेरपावेतो आरोग्य विभागांतर्गत झालेल्या प्रा.आ.केंद्र/उपकेंद्र बांधकाम व दुरूस्तीच्या कार्याची माहिती शा.अ.बांधकाम विभाग क्र.१ व २ यांनी आपआपल्या विभागांतील बांधकामाचा सविस्तर माहिती सभागृहात सादर केली.यामध्ये प्रा.आ.केंद्रे/उपकेंद्रा मधील किती कामे पुर्ण झालेली आहे व किती कामे प्रगतीपथावर आहे तसेच काही ठिकाणी जागा उपलब्ध न झाल्यामुळे जागा उपलब्ध होतांच नविन बांधकामे हाती घेण्यांत येईल त्याचप्रमाणे जी बांधकामे पुर्ण झालेली आहे त्या कामांस आरोग्य विभागांस हस्तांतरीत केल्यांचे सांगीतले.व काही किरकोळ कामे बाकी असल्यामुळे, त्वरीत आरोग्य विभागांस हस्तांतरीत करण्यांची कार्यवाही करण्यांत येईल अशी माहिती शा.अ बा.वि. क्र १ व २ यांनी सभागृहांत सादर केली.

विषय क्रमांक १३ :— मा. सभापती याचे पुर्वपरवानगीने वेळेवर येणारे इतर विषय

मा. अध्यक्ष यांचे पुर्व परवानगीने सभागृहांत एकही विषय सादर करण्यांत आला नाही

शेवटी उपस्थित सन्मा.सदस्य व अधिकारी यांनी सभेच्या कामकाजांस भाग घेउन सहकार्य केल्या बाबत उपस्थितांचे आभार मा. अध्यक्ष. यांचे परवानीने सभा संपल्यांचे सचिव तथा जिआअ यांनी जाहीर केले.

सचिव तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,यवतमाळ

अध्यक्ष
जिल्हा परिषद, यवतमाळ